


दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे अंक : २७५वा बुधवार दि १४ जानेवारी २०२६ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# भाजपच्या गोटात घडामोडींना वेग, २० जानेवारी महत्त्वाचा दिवस; मोदी, शहांसह दिग्गज उपस्थित राहणार

**वृत्तसंस्था/ नवी दिल्ली**

पौष महिना संपल्यानंतर सत्ताधारी भारतीय जनता पक्षात घडामोडी घडणार आहेत. त्याची तयारी आतापासूनच सुरु झाली आहे. भाजपनं नवं नेतृत्व पुढे आणण्याचा निर्णय घेतला आहे. सध्याच्या घडीला कार्यकारी अध्यक्ष असलेले नितीन नबीन २० जानेवारीला राष्ट्रीय अध्यक्ष पदाची सुत्रं हाती घेतील. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी , गृहमंत्री अमित शहांसह सगळे दिग्गज नेते उपस्थित असतील. यामध्ये मुख्यमंत्री, राष्ट्रीय पदाधिकारी, प्रदेशाध्यक्ष आणि राष्ट्रीय कार्यकारिणीचे सदस्य हजर राहणार आहेत. १८ जानेवारीला पौष महिना संपत आहे. पौष महिना अशुभ मानला जात आहे. त्यामुळेच नितीन नबीन पौष महिना संपल्यावर राष्ट्रीय अध्यक्ष पदाची सुत्रं स्वीकारतील. ते विद्यमान अध्यक्ष जे. पी. नड्डा यांची जागा घेतील. नड्डा यांचा कार्यकाळ २०२४ मध्येच संपला आहे. पण त्यांना मुदतवाढ देण्यात आली. नितीन नबीन यांच्याकडे कार्यकारी अध्यक्षपद देण्यात आल्यापासूनच पक्षातील बड्या नेत्यांकडून त्यांना सहकार्य मिळत आहे. त्यामुळे २० जानेवारीला होणारी अध्यक्ष पदाची निवडणूक केवळ औपचारिकता असेल. नितीन नबीन पक्षाचे सगळ्यात तरुण राष्ट्रीय अध्यक्ष असतील. याआधी ते बिहार सरकारमध्ये मंत्री राहिले आहेत. ते ४६ वर्षांचे आहेत. त्यांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा पूर्ण पाठिंबा आहे. नितीन नबीन यांच्याकडे अध्यक्ष पदाची धुरा देण्याचे अनेक राजकीय अर्थ आहेत. नबीन यांच्या रुपात पक्षानं नव्या पिढीकडे अध्यक्षपद दिलं आहे. शिवराजसिंह चौहान, मनोहरलाल खट्टर, धर्मेंद्र प्रधान यांच्यासारख्या दिग्गजांची नावं चर्चेत असताना नबीन यांची निवड करण्यात आली. त्यामुळे जुन्या नेत्यांना बाजूला सारुन नव्या पिढीकडे पक्ष सोपवण्यात येत असल्याचा स्पष्ट संदेश देण्यात आला आहे. नितीन नबीन यांच्या सारख्या तरुणाकडे पक्षाची जबाबदारी देण्यात आल्यानं भाजप मध्ये अनेक बदल होण्याची दाट शक्यता आहे. नबीन यांचा कार्यकाळ ३ वर्षांचा असेल. याचा अर्थ भाजप त्यांच्याच नेतृत्त्वात पुढील



निवडणूक लढवेल. त्यामुळे संघटनात्मक पातळीवर पक्षाला अधिक बळकट करण्याची जबाबदारी नबीन यांना पेलावी लागेल. १५ डिसेंबरला त्यांची कार्यकारी अध्यक्षपदी नियुक्ती झाली. पौष महिना असल्यानं त्यांनी राष्ट्रीय अध्यक्ष पदाची जबाबदारी हाती घेतली नाही.

# राज ठाकरेंच्या आदेशाची धास्ती! दुबार मतदारांबाबत इशारा, निवडणूक आयोगाने उचललं मोठं पाऊल

**वृत्तसंस्था/मुंबई**

गेल्या काही महिन्यांपासून मतदारयाद्यांतील दुबार मतदारांचा प्रश्न उपस्थित झाला आहे. त्यासाठी सॉफ्टवेअर वापरून संभाव्य दुबार मतदारांची नावे वेगळी करण्यात आली होती; तसेच मतदारयाद्यांतील दुबार मतदारांच्या नावापुढे दोन स्टार लावण्यात आल्याचे आयोगाकडून सांगण्यात येत आहे. परंतु त्यावरून राजकीय पक्षांकडून कार्यकर्त्यांना दुबार मतदारांवर लक्ष ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. नेत्यांनी दिलेल्या आदेशामुळे मतदान केंद्रांच्या बाहेर हाणामारी झाल्याच्या घटना नगर परिषद आणि नगर पंचायत निवडणुकीदरम्यान घडल्याचे दिसून आले होते. त्याचीच पुनरावृत्ती महापालिका निवडणुकीत होऊ नये यासाठी निवडणूक आयोगाकडून पोलिसांना स्पष्ट सूचना देण्यात आले आहेत. दुबार मतदार दिसला की त्याला तुडवा,फ या काही राजकीय पक्षांच्या पवित्र्यामुळे कायदा व सुव्यवस्था बिघडू नये याची काळजी घेण्याची सूचना राज्य निवडणूक आयोगानेपोलिसांना दिली आहे. मतदान केंद्राच्या परिसरात कुठल्याही प्रकारची कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण होऊ देऊ नये; तसेच पक्षाच्या कार्यकर्त्यांना कायदा हाती घेण्यापासून रोखण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. महापालिका निवडणुकीसाठी गुरुवारी होणाऱ्या मतदानाच्या दिवशी कायदा-सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी मुंबईपोलिसांनी जय्यत तयारी केली आहे. धार्मिक आणि इतर मुद्द्यांवर संवेदनशील मतदान केंद्रे नसली तर खुल्या मतदान केंद्रांवर विशेष लक्ष ठेवण्याचे आदेश पोलिसांना देण्यात आले आहेत. संपूर्ण मुंबईत ३० हजार पोलिसांचा फौजफाटा तैनात करण्यात ठेवण्यात येणार असून, एसआरपीएफ, क्यूआरटीसह इतर तुकड्यांची अतिरिक्त फौज असेल, अशी माहिती मुंबई पोलिसांनी दिली. मुंबईमध्ये मतदान शांततेत आणि सुरळीत पार पाडण्यासाठी मुंबई पोलिस सज्ज झाले आहेत. कोणताही अनुचित प्रकार करण्याचे धाडस कुणी करू नये, यासाठी अनेक ठिकाणी पोलिसांमार्फत मंगळवारी पथसंचलन करण्यात आले. समाजकंटक तसेच पक्षाच्या कार्यकर्त्यांना समज देण्यात आली आहे. मतदानादिवशी कडक बंदोबस्त ठेवण्यात आला असून, दहशतवादविरोधी उपाययोजना करण्यात आल्या आहेत. मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात अधिक खबरदारी घेण्यात येणार आहे. दंगल नियंत्रण पथकाला सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या



आहेत. पोलिस आयुक्त, मुंबई देवेन भारती, कायदा आणि सुव्यवस्था सांभाळणारे सहआयुक्त सत्यनारायण चौधरी या अधिकाऱ्यांच्या प्रत्यक्ष देखरेखीखाली संपूर्ण मुंबईत पोलिस कर्तव्य बजावणार आहेत. मुंबईत सुमारे २३९९ खुली, तर २५७६ अर्धबंदिस्त जागेत मतदान केंद्रे आहेत. या केंद्रांना जास्त सुरक्षा व्यवस्था पुरविण्यात यावी, असे आदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार इमारतींमधील बंदिस्त असलेल्या मतदान केंद्रांपेक्षा या खुल्या मतदान केंद्राच्या परिसरात पोलिसांचे अधिक मनुष्यबळ तैनात असणार आहे.

# ...सिझेरियनचा चक्रव्यूह...

वैद्यकीय व्यवसायाच्या इतिहासात सिझेरियन इतकी वादाच्या भोवऱ्यात अडकलेली दुसरी शस्त्रक्रिया नसेल! सुरुवातीपासूनच या शस्त्रक्रियेच्या चर्चेत धार्मिक, राजकीय, नैतिक, आणि सामाजिक विचारांनी खूप मोठी भूमिका बजावलेली आहे. इतके की, कधीकधी त्या कोलाहलात वैद्यकीय विचार पूर्णपणे झाकले गेलेले आहेत. सध्या आपल्याकडे देखील काहीशी तशीच परिस्थिती निर्माण झालली आहे. आज जगभर, विविध धोकादायक परिस्थितींत अर्भक आणि माता, दोघांचीही सहीसलामत सुटका करणे यासाठीचा एक उत्तम, सुरक्षित आणि खात्रीलायक मार्ग म्हणून सिझेरियनवर शिक्कामोर्तब झालेले आहे. जेथे सिझेरियन अटळ आहे अशा कारणांविषयी कोणाचीच हरकत नसावी. उदा. जुळे किंवा पायाळू गर्भ, वारी गर्भाशयाच्या तोंडाजवळ अथवा तोंडावरच असणे, गर्भिणी अपस्मार () इ. पुढचा वर्ग आहे तो मातेच्या शरीरातून ज्या मार्गाने गर्भ बाहेर येतो तो मार्ग आणि गर्भाचे आकारमान यांच्यातील विषमता. गर्भ खूप मोठा असणे, मार्ग खूप अरुंद असणे किंवा काही प्रमाणात दोन्ही गोष्टी एकत्र असणे याला (सीपीडी) असे शास्त्रीय नाव आहे. सर्व आधुनिक तंत्रज्ञान वापरून केलेले असले तरी देखील शेवटी हे निदान व्यक्तीनिष्ठ आहे. शंका, टिका आणि वादाला येथे सुरुवात होते. टिकाकारांचं म्हणणं असं आहे की, डॉक्टर (मुख्यतः पैशांच्या लोभापायी) ही पळवाट वापरून या शस्त्रक्रियेचा गैरवापर करतात. या आरोपांच्या पुष्टीसाठी सामान्य प्रसूतीच्या तुलनेत सिझेरियन शस्त्रक्रियेच्या वाढत्या टक्केवारीकडे बोट दाखविले जाते. वैद्यकीय शास्त्राचे शिक्षण घेताना (आपापल्या विश्वासाप्रमाणे) परमेश्वर किंवा निसर्गाच्या करामतीने थक्क होण्याचे प्रसंग वारंवार येतात. परंतु सर्वांत जास्त थक्क करणारा चमत्कार म्हणजे नॉर्मल प्रसूती! मनुष्य जातीच्या उगमापासून ही प्रक्रिया प्रत्येक जन्माच्या वेळी परत परत बहुतेक वेळा सुरळीतपणे चालत आली आहे. मग आत्ताच डॉक्टरांच्या लुडबुडीची आणि सिझेरियन ऑपरेशनची एवढी अधिक गरज का भासू लागली? याचे उत्तर समजण्यासाठी भावनावेशाला थोडा आवर घालावा लागेल. प्रसूतीच्या प्रक्रियेत सहभाग घेणारी सर्व इंद्रिये, स्नायू, श्रोणी-तल ( ) इत्यादी त्यांच्या त्यांच्या कार्यक्षमतेच्या उभारीवर असायला हवेत. यामध्ये हार्मोन्सचा देखील फार मोठा भाग आहे. गेल्या ५०-१०० वर्षांमध्ये मनुष्य जातीने एकूणच शारीरिक श्रम करणे जवळजवळ सोडून दिलेले आहे. प्रस्तुत विषयापुरते त्याचे स्त्रीच्या शरीरावर होणारे दुष्परिणाम लक्षात घ्यायला हवेत. यांच्या बदली आपण जीवनशैलीमध्ये तितकेच उपयोगी असे दुसरे काही व्यायाम अंतर्भूत केले आहेत का? वाढते वय आणि सुखवस्तूपणा याबरोबर वेदना सहन करण्याची क्षमता/तयारी कमी होते. समाजात आढळणारी वाढत्या वजनाची प्रवृत्ती देखील विचारात घ्यावयास हवी. १५ ते ४९ वयोगटातील जवळजवळ २५ टक्के स्त्रियांचे वजन असावे त्यापेक्षा जास्त आहे, किंवा त्या वैद्यकीय दृष्ट्या लठ्ठ आहेत. याचे सर्वसामान्य गर्भधारणेच्या आणि प्रसूतीच्या संपूर्ण प्रक्रियेवर नकारात्मक परिणाम होतात. निसर्गामध्ये पुनरुत्पादनासाठी एक आदर्श वयोमर्यादा घातलेली दिसते. मानवामध्ये २०-२१व्या वर्षी पुनरुत्पादनाच्या दृष्टीने आदर्श परिस्थितीमध्ये असलेल्या स्त्री आणि पुरुषांच्या सर्व शरीर संस्था - पहिल्या प्रसूतीचे नियोजन सात-आठ वर्षानंतर करायचे असल्यास - तितक्याच क्षमतेने काम करतील ही अपेक्षा शास्त्रीय नक्कीच नाही. आज लग्नाचे साधारण वय मुलींमध्ये पंचविशीच्या पुढे तर मुलांमध्ये तिशीपर्यंत पोचलेले आहे. त्यानंतर दोन-तीन वर्षे मूल न होऊ देण्याचा प्रघात. करियरसाठीचा वेळ. या सर्व नियोजनामध्ये मूल होण्यासाठी बऱ्याचदा दोघांच्या आयुष्यातील एक विशिष्ट कालावधी नियुक्त करण्यात येतो. वर उल्लेख केलेल्या विविध कारणांमुळे गर्भधारणेत अधिकाधिक जोडप्यांना अडचणी येऊ लागलेल्या आहेत. याचा अर्थ प्रत्येक महिलेसाठी सिझेरियन अटळ आहे असा अजिबात नव्हे! सामान्य प्रसूतीचा प्रयत्न यशस्वी होण्याची शक्यता वरील प्रत्येक घटकामुळे थोडी थोडी कमी होऊ शकते, हे स्पष्ट करणे एवढाच या विवेचनाचा हेतू आहे. तसेच कोणताही वैद्यकीय निर्णय घेत असताना डॉक्टरच्या मनात ग्राहक संरक्षण कायद्याचा बागुलबुवा नसावा, ही अपेक्षा आदर्श आहे; परंतु व्यवहार्य नाही. नॉर्मल डिलिव्हरीचफ अशी करतात. जोवर सारे काही सुरळीत पार पडते तोपर्यंत काहीच तक्रार नाही. पण यात गोम एवढीच आहे की, (खरेतर संपूर्ण देशात) होणाऱ्या सर्व प्रसूतींचा एकत्रीत विचार होणे सयुक्तिक नाही का? केलेल्या संघटनेवर फौजदारी कारवाई सुरू आहे.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# अजित पवारांच्या सल्लागाराच्या कार्यालयात पोलीस घुसले.. नरेश अरोरा माध्यमांसमोर

**पुणे :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे राजकीय सल्लागार नरेश अरोरा यांच्या डिझाईन बॉक्स कार्यालयात आज पुणे गुन्हे शाखेचे पथक गेले. या पथकाकडून कार्यालयातील कर्मचाऱ्यांकडे काही गोष्टींची विचारणा करण्यात आली. पोलिसांनी यावेळी काही कादगपत्रे देखील तपासली. यानंतर काही वेळाने हे पथक निघून गेलं. पण पुणे पोलीस अजित पवारांच्या राजकीय सल्लागाराच्या कार्यालयात घुसल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. प्रचाराचा वेळ संपल्यानंतर अचानक अशाप्रकारे पोलीस कार्यालयात गेल्याने त्याचा नेमका अर्थ काय पकडायचा? असा प्रश्न उपस्थित केला जात होता. अखेर या प्रकरणावर नरेश अरोरा यांनी माध्यमांसमोर येत प्रतिक्रिया दिली आहे.आज संध्याकाळी आमच्या डिझाईन बॉक्सच्या पुणे शाखेवर क्राईम ब्रांच येथून



काही जण आले होते. मी ऑफिसमध्ये नव्हतो. तसेच आमचे सिनियरही ऑफिसमध्ये नव्हते. त्यामुळे जे कर्मचारी ऑफिसमध्ये होते त्यांना त्यांची विचारले की, इथे काय काम होतं? राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचं काय काम होतं? याबाबत त्यांनी माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला. आमच्या कर्मचाऱ्यांनी त्यांना जितकी माहिती होती तितकी माहिती दिली', असं नरेश अरोरा यांनी सांगितलं.त्यानंतर त्यांनी काही दस्तावेज मागितले, ते दस्तावेज दाखवण्याची म गणी केली. काही नंबर मागितले. आमचे कर्मचारी म्हणाले की, आमच्या ऑफिसमध्ये आमचे वरिष्ठ नाहीत. त्यामुळे आम्ही तुम्हाला ही माहिती अशी देऊ शकत नाहीत. त्यानंतर आमचे कर्मचारी संदीप यांनी त्यांना विचारण्याचा प्रयत्न केला. आपण कोण आहात, कुठून आला आहात? आपला परिचय द्या, असं आमच्या कर्मचाऱ्याने विचारलं. त्यावर त्यांनी आपण क्राईम ब्रांच इथून आल्याचं सांगितलं. त्यानंतर त्यांनी आमचे सीईओ आणि सिनियर मॅनेजर अमन सर यांचं नाव आणि फोन नंबर विचारला. जेव्हा आमच्या कर्मचाऱ्याने त्यांच्यासोबत बातचित करुन देऊ का? असं विचारलं तेव्हा त्यांनी नकार दिला', अशी माहिती नरेश अरोरा यांन दिली.उपमुख्यमंत्री अजित पवार यांची पत्रकार परिषद सुरु होती. आम्ही त्या ठिकाणी बिझी होतो. त्यानंतर आम्ही माहिती मि ळवण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी आम्हाला माहिती मिळाली की, त्यांना एक तक्रार मिळाली होती. त्यामुळे ते आमच्या कार्यालयात आले होते. त्यांनी जो नंबर दिला होता त्यावर आम्ही फोन करण्याचा अनेकदा प्रयत्न केला. पण फोन उचलण्यात आला नाही. पक्षाकडूनही उच्च अधिकाऱ्यांसोबत बातचित करण्याचा आली आहे. पण त्यामधूनही नेमकं काय प्रकरण आहे ते समोर आलेलं नाही. आमच्या संस्थेने त्यांना सहकार्य केलं आहे. याआधी सहकार्य हवं असेल तर आम्ही सहकार्य करु', अशी प्रतिक्रिया नरेश अरोरा यांनी दिली.

## शिंदे-नाईक संघर्ष पेटला ; वयावरच्या टीकेला प्रत्युत्तर देत नाईकांचं आव्हान

**मुंबई :** नवी मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीचा प्रचार सध्या शिगेला पोहोचला असून, त्याचबरोबर राजकीय आरोप-प्रत्यारोपांनाही धार येऊ लागली आहे. निवडणुकीच्या रणधुमाळीत गेल्या काही दिवसांपासून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि वनमंत्री गणेश नाईक यांच्यातील संघर्ष अधिकच तीव्र होत चालला आहे. त्यातच खासदार श्रीकांत शिंदे यांनी नाव न घेता केलेल्या खोचक टीकेनंतर नवी मुंबईतील राजकीय वातावरण अक्षरशः तापले आहे.खासदार श्रीकांत शिंदे यांनी अलीकडेच एका कार्यक्रमात, ‰काही लोकांना वयानुसार प्रॉब्लेम होत असतोŠ असे वक्तव्य करत अप्रत्यक्षपणे गणेश नाईक यांच्यावर निशाणा साधला होता. या वक्तव्याने नाईक समर्थकांमध्ये नाराजी पसरली होती. या टीकेला उत्तर देताना वनमंत्री गणेश नाईक यांनी रविवारी घणसोली येथे भाजप उमेदवारांच्या प्रचारसभेत आक्रमक भूमिका घेत थेट प्रत्युत्तर दिलेमाझं वय झालं आहे असं म्हणतात. पण तुझ्या वडिलांना माझ्यासोबत चालायला सांग. अर्धा तास तरी चालतात का ते पाहू,Š असा खोचक टोला गणेश नाईक यांनी



श्रीकांत शिंदे यांना लगावला. याचवेळी त्यांनी, ‰दिलेलं आव्हान हरलो, तर राजकारण सोडून देईन,Š असे ठणकावून सांगत थेट आव्हान दिले. या वक्तव्याला उपस्थित कार्यकर्त्यांकडून जोरदार प्रतिसाद मिळाला.

नाईक यांनी यावेळी आपण आजही शारीरिक आणि राजकीयदृष्ट्या पूर्णपणे तंदुरुस्त असल्याचे सांगत, वयावरून केलेली टीका साफ फेटाळून लावली. त्यांच्या या आक्रमक भूमिकेमुळे प्रचारसभेत एकच खळबळ उडाली. परिणामी, महापालिका निवडणूक केवळ स्थानिक प्रश्नांपुरती मर्यादित न राहता, राज्यस्तरीय नेत्यांच्या प्रतिष्ठेची लढाई बनल्याचे स्पष्ट होत आहे.नवी मुंबईत याआधीच विविध विकासकामे, स्थानिक प्रश्न आणि सत्तासमीकरणांवरून राजकीय संघर्ष सुरू होता.

## काकांबद्दल 'तो' प्रश्न येताच दादांचे कानावर हात

**पुणे :** पुणे, पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकांमध्ये भाजप विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात काँटे की टक्कर पाहायला मिळत आहे. पुणे, पिंपरी-चिंचवडमध्ये अखेरची निवडणूक २०१७ मध्ये झाली. त्या निवडणुकीत भाजपनं अजित पवारांच्या हातून सत्ता खेचली. गमावलेली सत्ता परत आणण्यासाठी अजित पवारांनी काका शरद पवार इंशी जुळवून घेतलं. त्यांच्या पक्षाशी आघाडी केली. दोन्ही महापालिकांमध्ये दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र आल्या आहेत. त्यांच्या समोर भाजपचं आव्हान आहे. गेल्या काही महिन्यांमध्ये अजित पवारांची काका शरद पवार यांच्याबद्दलची भाषा आणि भूमिका कमालीची बदलली आहे.राज्यात भाजप सोबत सत्तेत असताना महापालिका निवडणुकांमध्ये शरद पवार यांच्याशी युती कशी काय केली, असा प्रश्न अजित पवार ांना विचारण्यात आला. त्यावर स्थानिक कार्यकर्त्यांच्या आग्रहाखातर हा निर्णय घेतल्याचं अजित पवारांनी सांगितलं. मी सुप्रिया सुळे यांना फोन केला. आम च्यात संवाद झाला. त्यानंतर हा निर्णय घेण्यात आल्याचं अजित पवारांनी सांगितलं. आमच्यातील चर्चा संपल्यावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मंत्री उदय सामंत यांनी युतीसाठी हात पुढे केला होता.

## अजित पवारांचे राजकीय सल्लागार नरेश अरोरांच्या कार्यालयात पोलीस पोहोचले

**पुणे :** राज्यभरात महापालिका निवडणुकांच्या प्रचाराच्या तोफा आता थंडावल्या आहेत. यानंतर येत्या १५ जानेवारीला मतदान होणार आहे. मतदान दोन दिवसांवर असताना पुण्यातून सर्वात मोठी बातमी समोर येत आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे राजकीय सल्लागार नरेश अरोरा यांच्या कार्यालयावर पोलीस गेल्याची माहिती आहे. पुणे पोलिसांचे क्राईम ब्रांचचे पथक नरेश अरोरा यांच्या कार्यालयात दाखल झाले होते. नरेश अरोरा यांच्याशी संबंधित 'डिझाईन बॉक्स'च्या कार्यालयात पुणे पोलिसांच्या क्राईम ब्रांचची टीम दाखल झाली. या पथकाकडून कागदपत्रांची तपासणी केली जात असल्याची माहिती समोर येत होती. पण पोलिसांच्या या कारवाईवर आता पुणे पोलीस आयुक्तांकडून स्पष्टीकरण देण्यात आलं आहे. नरेश अरोरांवर कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याची माहिती पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली आहे.एकीकडे महापालिका निवडणूक रंगात आलेली आहे. दोन दिवसांवर मतदान आहे. पण असं असताना अचानक पुण्यातील अजित पवारांचे राजकीय सल्लागार नरेश अरोरा



यांच्या कार्यालयात क्राईम ब्रांचची टीम पोहोचल्याने अनेकांच्या भुवया उंचवल्या. पोलीस संबंधित कार्यालयात नेमकं का गेले आहेत? ते कोणत्या कागदपत्रांची तपासणी करत आहेत? याबाबत अनेकांना प्रश्न पडला होता. अखेर याबाबत पोलीस आयुक्तांनीच स्पष्टीकरण दिलं आहे.पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेबाबत वृत्तावाहिन्यांवर वृत्त प्रसारित झाल्यानंतर आता पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांची प्रतिक्रिया समोर आली आहे. 'नरेश अरोरा यांच्यावर कारवाई केलेली नाही', असं अमितेश कुमार यांनी स्पष्ट केलं आहे. 'गुन्हे शाखेला मिळालेल्या तक्रारीची पडताळणी करण्यासाठी अधिकारी गेले होते. तक्रारीत तथ्य नसल्याने अधिकारी परतले आहेत', असंदेखील अमितेश कुमार यांनी स्पष्ट केलं आहे.नरेश अरोरा हे अजित पवार यांचे राजकीय सल्लागार मानले जातात.

## 'कमळा'ची बदनामी, भाजपच्या बड्या नेत्याची पक्षातून हकालपट्टी

**नाशिक :** भाजपने अनेक वेळा समज देऊनही सतत भाजपच्या ध्येय-धोरणांविरुद्ध भूमिका घेत असल्याने भाजपचे बुद्धिजीवी प्रकोष्टचे महाराष्ट्र प्रदेश सहसंयोजक रोहन देशपांडे यांची पक्षातून सहा वर्षांसाठी हकालपट्टी करण्यात आली.भाजपच्या विरोधात प्रतिक्रिया देणे, तपोवन येथील वृक्षतोडीसंदर्भात अनेकवेळा भाजपने खुलासे करूनही रोहन देशपांडे यांनी वेळोवेळी भाजपच्या विरोधात भूमिका घेतल्या. भाजपच्या केंद्रीय व प्रदेश नेतृत्वाने एखाद्या विषयावर भूमिका घेतल्यानंतर देशपांडे सतत त्याविरोधात भूमिका घेत होते.विशेषतः डावे पक्ष, मनसे, काँग्रेस, उबाठा या विरोधी पक्षांच्या नेत्यांसोबत आंदोलनात




सहभागी होऊन भाजपला बदनाम करण्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. त्यामुळे देशपांडे हे भाजपचे की भाजपविरोधी पक्षांचे प्रतिनिधित्व करतात की काय? असा प्रश्न निर्माण झाला. त्यामुळे ही कारवाई केली, असे शहराध्यक्ष सुनील केदार यांनी सांगितले. दुसरीकडे, 'पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीत भाजपसमवेत महायुतीसाठी प्रयत्न केले; परंतु त्यांची सर्वंकष सत्तेची महत्त्वाकांक्षा आणि इतरांना कमी लेखण्याच्या कार्यपद्धतीम ुळे शिवसेनेने हिंदुत्व विचारधारा आणि विकासाची भूमिका कायम ठेवून पुण्यात स्वतंत्र; तर पिंपरी-चिंचवडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेससमवेत निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला,' असे शिवसेनेचे नेते उदय सामंत यांनी नमूद केले.सामंत यांनी प्रचाराच्या समारोपानंतर मतदारांना खुले पत्र लिहून भाजपच्या सत्ताकेंद्रित भूमिकेवर अप्रत्यक्ष निशाणा साधला. शिवसेनेच्या संयत प्रचाराला मतदारांना प्रतिसाद दिला असून, पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिकांमध्ये सत्तास्थापनेसाठी शिवसेनेची मदत घ्यावीच लागेल, असा विश्वासही त्यांनी या पत्रात व्यक्त केला आहे.

पुणे महापालिका निवडणुकीत मतदारांना पैशांचे आमिष दाखवून उम ेदवारांना धमक्या देऊन दबावाचे राजकारण सुरू असल्याचा आरोप शिवसेनेच्या नेत्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी मंगळवारी केला. मागील निवडणुकीत पैसे वाटप झालेल्या भागांतील अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्या असल्या, तरी त्यांचे उद्योग दुसऱ्या ठिकाणी सुरू असून, राज्य निवडणूक आयोगाने कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी पत्रकार परिषदेत केली.

# पुण्याहून महाबळेश्वरला फिरायला, पैशांवरून जोरदार भांडण, ताम्हिणी घाटात रक्तरंजित थरार

**रायगड :** पुण्याहून महाबळेश्वरला फिरण्यासाठी निघालेल्या तरुणाचा मित्रांकडूनच निर्घृण हत्या करून मृतदेह सणसवाडी गावाच्या हद्दीत टाकून दिल्याची थरारक घटना उघडकीस आली असून, ताम्हणी घाट परिसरात खळबळ उडाली आहे. पैशाच्या वादातून घडलेल्या या रक्तरंजित घटनेचा माणगांव पोलिसांनी अवघ्या सहा ते आठ तासांत छडा लावत दोन आरोपींना अटक केली आहे.माणगांव पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक १८/२०२६ भा.न्या.संहिता २०२३चे कलम १०३(१) अन्वये हा गुन्हा दाखल करण्यात आला होता. दि. ११ जानेवारी २०२६ रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास सणसवाडी गावच्या हद्दीतील सिक्रेट पॉईट परिसरात एका २५ ते ३० वयोगटातील



तरुणाची धारदार शस्त्राने हत्या झाल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. सुरुवातीला मृतकाची ओळख न पटल्याने ही अज्ञात हत्या पोलिसांसमोर मोठं आव्हान ठरलं होतं. घटनास्थळी पोलीस अधिकारी व तपास पथकाने तात्काळ भेट देऊन पंचनामा केला. रायगड जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाणे तसेच पुणे शहर व पुणे ग्रामीण पोलीस कंट्रोल रूमकडे मिसिंग व्यक्तींबाबत माहिती मागवण्यात आली. गुप्त बातमीदार, तांत्रिक विश्लेषण, सीसीटीव्ही फुटेज आणि मोबाईल लोकेशनच्या आधारे पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली.तपासात मृतकाची ओळख आदित्य गणेश भगत (वय २२, रा. साई रेसिडेन्सी, इंद्रायणी नगर, भोसरी) (मूळ रा. चोवे पिंपरी, ता. माढा, जि. सोलापूर) अशी निष्पन्न झाली.

पुढील तपासात ही हत्या त्याच्यासोबत प्रवास करणाऱ्या मित्रांनीच केल्याचं उघड झालं. पोलीस तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, आदित्य भगत, अनिकेत महेश वाघमारे, तुषार उर्फ सोन्या शरद पोटोळे आणि प्रज्वल उर्फ सोन्या संतोष हंबीर हे चौघे इनोव्हा क्रिस्टा चक१२ दच/९४४८ या वाहनातून पुण्याहून ताम्हणी घाट मार्गे महाबळेश्वरला फिरण्यासाठी निघाले होते. प्रवासादरम्यान पैशांच्या वादातून गाडीतच वाद विकोपाला गेला.वादातून आरोपींनी आदित्यचा इनोव्हा कारमध्येच दोरीने गळा आवळला. त्यानंतर सणसवाडी गावच्या हद्दीत सिक्रेट पॉईटकडे जाणाऱ्या रस्त्यालगत असलेल्या मोकळ्या जागेत नेऊन कोयत्याने त्याच्या डोक्यावर, गळ्यावर आणि हातावर वार करून त्याची निर्घृण हत्या करण्यात आली. हत्या केल्यानंतर मृतदेह तेथेच टाकून आरोपी पसार झाले.प्रकरणात अनिकेत महेश वाघमारे (वय २६) आणि तुषार उर्फ सोन्या शरद पोटोळे (वय २४) यांना अटक करण्यात आली असून, प्रज्वल उर्फ सोन्या संतोष हंबीर हा आरोपी फरार आहे.

## आठ वर्षांपासून ती हातही लावू देईना, संतापलेल्या पतीने पत्नीला संपवल

**इंदूर :** एका पतीने आपल्या पत्नीची हत्या केली, कारण ती त्याच्याशी बराच काळापासून लैंगिक संबंध ठेवण्यास नकार देत होती. ही घटना मध्य प्रदेशातील इंदूरमध्ये घडली आहे. पतीने गळा आवळून पत्नीची हत्या केली होती. सुरुवातीला त्याने हा अपघात असल्याचं दर्शवलं, पण पोलिस तपासात सत्य उघड झालं.याप्रकरणी मिळालेल्या माहितीनुसार, इंदूरच्या एअरोड्रोम पोलिस स्टेशन परिसरात ही खळबळजनक घटना घडल्याची माहिती आहे. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, ९ जानेवारीला ४० वर्षीय महिलेचा मृत्यू झाल्याची नोंद करण्यात आली होती. त्यानंतर या प्रकरणाचा तपास सुरू करण्यात आला. सुरुवातीला सर्वांना वाटलं की हा नैसर्गिक मृत्यू आहे, परंतु जेव्हा शवविच्छेदन अहवाल समरर आला तेव्हा पोलिसांनाही धक्का बसला.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी पतीने स्वतः आपल्या पत्नीचा मृतदेह सरकारी महाराजा यशवंतराव रुग्णालयात आणला होता. तेथे, त्याने असे भासवले की रक्तदाब अचानक वाढल्याने ती कोसळली



आणि पडल्याने डोक्याला झालेल्या दुखापतीमुळे तिचा मृत्यू झाला. मात्र, शवविच्छेदन अहवालाने त्याचा संपूर्ण कट उघड केला.आरोपी हा व्यवसायाने मेकॅनिक आहे. त्याने पोलिसांना सांगितले की त्याची पत्नी गेल्या आठ वर्षांपासून त्याच्याशी शारीरिक संबंध ठेवण्यास नकार देत होती. यामुळे तो खूप संतापला होता आणि तणावात होता. आरोपीने सांगितले की, याच संतापाच्या भरात त्याने त्याच्या पत्नीचा गळा दाबून खून केला.

आरोपीने घटनेला अपघात दाखवण्याचा प्रयत्न केला आणि रुग्णालयात खोटी कहाणी सांगितली. पण, अखेर त्याचा कट उघडकीस आला. पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे आणि प्रकरणाचा तपास सुरु आहे.

## नवऱ्याचेच बंद खोलीत प्रेयसीशी..

**बंगळुरु :** पत्नीची फसवणूक, जातीवरुन शिवीगाळ आणि वारंवार शारीरिक हिंसाचार केल्याच्या आरोपानंतर बंगळुरुत सॉफ्टवेअर इंजिनिअरला अटक करण्यात आली आहे. आरोपी पतीचे विवाहबाह्य संबंध असून एका बंद खोलीत प्रेयसीसोबत वेळ घालवत असताना रंगेहाथ पकडून त्याला बेड्या ठोकण्यात आल्या.पत्नीने दाखल केलेल्या तक्रारीच्या आधारावर आरोपी पती जेड्रेला जेकब याला ताब्यात घेण्यात आले आहे. महिलेने पोलिसांना सांगितले की, पतीच्या बेरोजगारीच्या काळात त्याला आधार देण्यासाठी तिने वरिष्ठ पदावरील चांगल्या पगाराची नोकरी सोडली होती. तिने त्याला नोकरी शोधण्यासही मदत केली, असे तक्रारीत म्हटले आहे.तक्रारदार महिलेच्या म्हणण्यानुसार, त्यांच्या मुलाच्या जन्मानंतर दोघांमधील नातेसंबंध बिघडले. तिने आरोप केला, की तिच्या पतीने तिला जातीय शिवीगाळ करण्यास सुरुवात केली आणि तिला वारंवार शारीरिक मारहाण केली. तक्रारीत असेही म्हटले आहे की या हिंसाचारामुळे तिचा गर्भपात झाला.

## तू माझी नाही झाली तर... मृत तरुणाच्या कपाटात दीड महिन्यांनी पत्र सापडलं

**जयपूर :** एका तरुणाने आपल्या आयुष्याची अखेर केली होती. त्याच्या मृत्यूच्या जवळपास दीड महिन्यांनंतर त्याच्या कपाटात त्याने लिहिलेलं अखेरचं पत्र सापडलं आहे. ज्यामुळे या प्रकरणाचा अँगलच बदलला आहे. राजस्थानमधील जालोर जिल्ह्यातील अहोर पोलिस स्टेशन परिसरात ही धक्कादायक घटना घडल्याची माहिती आहे.अखेरच्या पत्रात तरुणाने त्याच्या प्रेयसीला उद्देशून काही गोष्टी लिहिल्याचं आढळून आलं आहे. ज्यामध्ये विश्वासघात आणि मानसिक त्रासाबद्दल त्याने लिहिलं होतं. सुसाईड नोट सापडल्यानंतर, मृताच्या वडिलांनी त्याच्या प्रेयसीवर जीव देण्यास प्रवृत्त केल्याचा आरोप केल्याचा आरोप करत तिच्याविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.परिसरातील गोदान गावातील रहिवासी दुदाराम मेघवाल यांचा २१ वर्षीय मुलगा सुरेश कुमार याने २९ नोव्हेंबर २०२५ ला आपल्या घरात पंख्याला गळफास घेऊन आपले आयुष्य संपवलं आहे. प्राथमिक तपासात कोणतंही ठोस कारण समोर न



आल्याने पोलिसांनी गुन्हा दाखल केला आणि तपास सुरू केला. मात्र, काहीही कारण समोर आलं नाही. त्यानंतर कुटुंबातील सदस्य या तरुणाच्या खोलीची साफसफाई करत असताना त्यांना कपाटात २९ नोव्हेंबर २०२५ रोजीची सुसाईड नोट सापडली.सुसाईड नोटमध्ये सुरेशने लिहिलं की, त्याने त्याच्या प्रेयसीला त्याची जीवनसाथी म्हणून स्वीकारले होते आणि आता तो इतर कोणावरही प्रेम करू शकत नाही. ती त्याचं पहिलं प्रेम होती, परंतु तिने त्याचा विश्वासघात केला. 'मेरी जान, काही हरकत नाही, आता मी निरोप घेत आहे...'मृताचे वडील दुदाराम मेघवाल सोमवारी पोलिस अधीक्षक कार्यालयात सुसाईड नोट घेऊन आले.

# सकाळी घरातून निघाली ती परतलीच नाही, दुसऱ्या दिवशी कारखाली बॉडी सापडली



**नोएडा :** एका पार्क केलेल्या कारखाली बेपत्ता तरुणीचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. ग्रेटर नोएडाच्या बीटा-२ पोलिस स्टेशन परिसरात या २७ वर्षीय महिलेचा मृतदेह बीटा-२ पार्कजवळ उभ्या असलेल्या कारखाली आढळून आल्याची माहिती आहे. रविवारी (११ जानेवारी) सकाळी ही महिला कामासाठी घराबाहेर पडली होती. पण, रात्री उशिरापर्यंत ती घरी परतली नाही. हा कुठला अपघात आहे की तिची हत्या झाली आहे, याचा तपास सध्या पोलिस करत आहेत.

याप्रकरणी मिळालेल्या अधिक माहितीनुसार, मृत महिलेचं नाव दीपा असल्याची माहिती आहे. ती मूळची महोबकंठ जिल्ह्यातील महोबा येथील पिपरी पोलीस स्टेशन हद्दीतील रहिवासी असल्याची माहिती आहे. ती तिच्या धाकट्या भावासोबत ग्रेटर नोएडाच्या सेक्टर बीटा-२ मध्ये भाड्याच्या घरात राहत होती. दीपा गेल्या वर्षभरापासून नोएडाच्या सेक्टर - ६० मध्ये एका कॉल सेंटरमध्ये काम करत होती.दीपा रविवारी सकाळी नेहमीप्रमाणे कामावर निघाली होती. परंतु रात्री उशिरापर्यंत ती घरी परतली नाही. तेव्हा तिच्या लहान भावाने तिला अनेक वेळा फोन केला. मात्र, तिचा मोबाईल फोन बंद येत असल्याने तो चिंतेत पडले. रात्री उशिरापर्यंत वाट पाहिल्याने आणि कोणताही संपर्क न झाल्याने त्याला काहीतरी अनुचित घडल्याचा संशय आला.सोमवारी (१२ जानेवारी) सकाळी बीटा-२ पोलिसांना एक फोन आला की, बीटा-२ पार्कजवळ उभ्या असलेल्या कारखाली एका तरुणीचा मृतदेह असल्याची माहिती मिळाली. माहिती मिळताच पोलिस आणि फॉरेन्सिक पथक घटनास्थळी दाखल झालं. मृतदेह बाहेर काढताच तो बेपत्ता असलेल्या दीपाचा मृतदेह असल्याचं समजलं. संशयास्पद परिस्थितीत कारखाली मृतदेह आढळल्याने संपूर्ण परिसरात एकच खळबळ उडाली. हा कुठला अपघात नाही, अशी चर्चा सध्या घटनास्थळी उपस्थित असलेल्यांमध्ये सुरु आहे. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेतला आणि शवविच्छेदनासाठी पाठवला आहे. तसेच, ज्या कारखाली ही बॉडी सापडली ती कारही जप्त करण्यात आली आहेयाप्रकरणी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुरुवातीला हा प्रकार संशयास्पद दिसत आहे. हा रस्ते अपघात किंवा गुन्हाही असू शकतो. सध्या पोलिस या प्रकरणाचा तपास करत आहेत. जवळच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेजही तपासले जात आहेत. मृत महिलेचे कॉल डिटेल्स आणि मोबाईल लोकेशनही तपासले जात आहे. रविवारपासून ही महिला कुठे-कुठे गेली, काय केलं याचाही तपास केला जात आहे. शवविच्छेदन अहवाल आल्यानंतरचं मृत्यूचं नेमकं कारण उघड होईल, असंही पोलिसांनी सांगितलं आहे. या घटनेने मात्र तिच्या कुटुंबाला मोठ धक्का बसला आहे.

# हरमनप्रीच्या तुफानी फटकेबाजीपुढे गुजरातचे लोटांगण



**नवी मुंबई :** नाद करा, पण मुंबईचा कुठे... हे हरमनप्रीत कौरच्या तुफानी खेळीने सर्वांना दाखवून दिले. गुजरातच्या संघाने या सामन्यात १९२ धावा फटकावल्या होत्या, त्यामुळे मुंबईचा संघ दुसरा सामनाही हरणार, असे काही जणांना वाटत होते. पण हरमनप्रीतने जी तुफानी फटकेबाजी केली, त्याच्या जोरावर मुंबई इंडियन्सला गुजरातच्या संघावर सात विकेट्स राखून दमदार विजय मिळवता आला. हरमनप्रीतने यावेळी ४३ चेंडूंत नाबाद ७१ धावा केल्या, यामध्ये तिने सात चौकार आणि एक षटकार लगावला.गुजरातच्या १९३ धावांचा पाठलाग करताना मुंबई इंडियन्सची कामगिरी चांगली झाली नाही. कारण गेल्या सामन्यात धडाकेबाज फटकेबाजी करणारी गुनालन कामिलिनी यावेळी मोठी खेळी साकारण्यात अपयशी ठरली. कामलिनी यावेळी १३ धावांवर बाद झाली आणि मुंबईला पहिला धक्का बसला. मुंबईची हिली मॅथ्यूजही २२ धावांवर बाद झाली, त्यामुळे मुंबईची यावेळी २ बाद ३७ अशी अवस्था झाली होती. पण त्यानंतर मुंबईची कर्णधार हरमनप्रीत कौर फलंदाजीला आली आणि तिने धावांचा वेग वाढवला. हरमनप्रीतला यावेळी अमनज्योत सिंगची चांगली साथ मि ळाली. अमनज्योतने यावेळी २६ चेंडूंत सात चौकारांच्या जोरावर ४० धावांची दमदार खेळी साकारली, पण तिचे अर्धशतक १० धावांनी हुकले. मुंबईची सेट झालेली खेळाडू बाद झाली खरी, पण हरमनप्रीतने यावेळी संघाची जबाबदारी आपल्या खांद्यावर घेतली.हरमनप्रीत कौरला यावेळी दैवानेही चांगली साथ दिली. कारण या सामन्यात तिला दोनदा जीवदान मिळाले. हरमनप्रीत कौरने या जीवदानांचा चांगलाच फायदा उचलला आणि तिने आपले अर्धशतक साजरे केले. या स्पर्धेतील सर्वाधिक अर्धशतकांचा विक्रम तिने आपल्या नावावर केला. त्याचबरोबर या स्पर्धेतील एक हजार धावाही तिने यावेळी पूर्ण केले. त्यामुळे हरमनप्रीत कौरसाठी हा सामना सर्वात खास ठरला.मुंबई इंडियन्सच्या गोलंदाजांची या सामन्यात गुजरातच्या संघाने चांगलीच धुलाई केल्याचे पाहायला मिळाले. गुजरातच्या एकाही खेळाडूने अर्धशतक झळकावलं नाही पण तरीही त्यांनी १९२ धावांचा डोंगर उभारला. गुजरातच्या भारती फुलमाळीने फक्त १५ चेंडूंत तीन चौकार आणि तीन षटकारांच्या जोरावर नाबाद ३६ धावांची तुफानी खेळी साकारली. भारतीला यावेळी जॉर्जिया वॅरेहमने ३३ चेंडूंत नाबाद ४३ धावांची खेळी साकारत चांगली साथ दिली.

# भारताचा दुसरा वनडे सामना नेमका किती वाजता सुरु होणार



**नवी दिल्ली :** भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील दुसरा वनडे सामना आता काही तासांवर येऊन ठेपला आहे. पण हा सामना नेमका किती वाजता सुरु होणार, याची माहिती आता समोर आली आहे.

भारताने पहिल्या वनडे सामन्या न्यूझीलंडवर चार विकेट्स राखून विजय मिळवला होता. आता दुसरा वनडे सामना दोन्ही संघांसाठी महत्वाचा असेल. कारण भारताने जर हा दुसऱ्या सामन्यात विजय मिळवला तर त्यांना ही मालिका जिंकता येणार आहे, पण त्याचवेळी न्यूझीलंडचे या स्पर्धेतील आव्हान संपुष्टात येईल. पण जर न्यूझीलंडने हा दुसरा सामना जिंकला तर त्यांना मालिकेत १-१ अशी बरोबरी करता येईल. हा दुसरा सामना १४ जानेवारी म्हणजेच बुधवारी होणार असून तो राजकोटच्या मैदानात खेळवला जाणार आहे. पण हा सामना नेमका किता वाजता सुरु होणार, याची माहिती समोर आली आहे.दुसरा वनडे सामन्यात कोणताही अडथळा नाही, हे पाहण्यासाठी पंच मैदानात दुपारी १२.०० वाजता उतरतील. सामना सुरु करायला जर कोणता अडथळा असेल तर ते मैदानातील प्रशासनाशी संपर्क साधतील आणि त्याबाबतची माहिती दोन्ही कर्णधारांना देतील. जर सामना सुरु करायला कोणताही अडथळा नसेल तर तर पंच दोन्ही संघांच्या कर्णधारांना टॉससाठी सज्ज राहण्यासाठी सांगतील. या सामन्याचा टॉस हा दुपारी १.०० वाजता होईल. टॉस झाल्यावर दोन्ही संघांचे कर्णधार आपले संघ जाहीर करतील. त्यानंतर दोन्ही संघांचे खेळाडू काही काळ मैदानात सराव करतील. टॉसनंतर अर्ध्या तासाने म्हणजेच दुपारी १.३० वाजता हा सामना सुरु होईल.

# बांगलादेशची विकेट या एका व्यक्तीने काढली, वर्ल्ड कपचा वादच संपवला

**नवी दिल्ली :** बांगलादेश भारताला मोठा धक्का देण्यासाठी वर्ल्ड कपचे कारण देत आहे. आम्हाला भारतात असुरक्षित वाटत आहे, त्यामुळे भारतात आम्ही एकही सामना खेळणार नाही, असे त्यांनी आयसीसीला सांगितले आहे. पण बांगलादेशला आता भारतात यावंच लागणार आणि त्यासाठी कारण ठरली आहे ही एक व्यक्ती. पण ही व्यक्ती नेमकी आहे तरी कोण, हे आता समोर आलं आहेबांगलादेश जगाला भारत किती असुरक्षित आहे, हे सांगण्याचा प्रयत्न करत आहे. आमचे खेळाडू भारतात असुरक्षित आहेत आणि त्यामुळे आम्हाला भारतात एकही वर्ल्ड कपचा सामना खेळायला नाही, असे बांगलादेशने आयसीसीला सांगितले आहे. पण आयसीसीने मात्र बांगलादेशला वर्ल्ड कपच्या सर्व सामन्यांचे नियोजन झाले आहे, त्यामुळे भारतामधील सामने कुठेच हलवता येणार नाहीत, हे स्पष्ट केले आहे. पण तरीही बांगलादेश कांगावा करून भारतात खेळायचे नाही, या मतावर ठाम असल्याचे दिसत आहे. पण बांगलादेशने कितीही विरोध केला तरी एका माणसामुळे आता बांगलादेशला भारतात यावंच लागेल. पण ही व्यक्ती आहे तरी कोण आणि या व्यक्तीमुळे का बांगलादेशला भारतात यावं लागेल, याचं कारणही आता समोर आलं आहे.बांगलादेश म्हणते की त्यांच्या देशांतील व्यक्तींना भारतात असुरक्षित वाटत आहे. सध्या भारत आणि न्यूझीलंड यांच्यात वनडे मालिका सुरु आहे. दोन दिवसांपूर्वीच भारत आणि न्यूझीलंड यांच्यात पहिला वनडे साम ना झाला.




या सामन्यासाठी शरफुदोऊल्ला शाहिद सैकत यांनी पंच म्हणून काम पाहिले. सैकत हे बांगलादेशचे आहेत. त्यामुळे आता वर्ल्ड कप नसूनही जर बांगलादेशची व्यक्ती भारतात येऊ शकते, तर वर्ल्ड कपच्यावेळी तर जबरदस्त सुरक्षा व्यवस्था असते, हे सर्वांना माहितीच आहे. त्यामुळे आता बांगलादेशला भारत असुक्षित असल्याचे म्हणूच शतक नाही. कारण बांगलादेशचे पंच जर भारतात येऊन आपले काम करू शकतात आणि त्यांना कोणताही धोका वाटत नाही तर बांगलादेशच्या खेळाडूंना असुरक्षित वाटण्याचे काहीच कारण नसल्याचे म्हटले जात आहे.बांगलादेशला आता भारतात या एका व्यक्तीमुळे यावं लागेल, कारण त्यांना कोणतीही सबब आयसीसीला देता येणार नाही, हे स्पष्ट झालं आहे.

# गंभीर यांच्या राजकारणाचा कैफने केला पर्दाफाश

**नवी दिल्ली :** गौतम गंभीर हे संघात खेळाडूंबरोबर कसं राजकारण करतात, याचा पर्दाफाश आता भारताचा माजी क्रिकेटपटू मोहम्मद कैफने केला आहे. मोहम्मद कैफने यावेळी शुभमन गिल आणि भारताच्या अजून एका खेळाडूचे नाव घेत, गौतम गंभीर हे कसे दुजाभाव करतात, हे दाखवून दिले आहे.गौतम गंभीर हे जेव्हापासून भारताच्या संघात प्रशिक्षक म्हणून दाखल झाले, तेव्हापासून सुरु झालेले वाद हे अजूनही थांबलेले नाहीत. भारतीय संघात आल्यावर त्यांनी आपली रणनिती अशी राबवली की, कोणाचेही त्यांनी ऐकले नाही. रोहित शर्मा आणि विराट कोहली सारख्या दिग्गज खेळाडूंना तर त्यांनी कसोटी संघाच्या बाहेर बसवले. शुभमन गिलला यावेळी गौतम गंभीर यांनी पुढे आणले. शुभमन गिलबाबत गौतम गंभीर यांनी एकामागून एक धडाकेबाज निर्णय घेतले. पण हे करत असताना एका खेळाडूवर मात्र त्यांनी अन्याय केला.भारत आणि न्यूझीलंड यांच्यात





दोनच दिवसांपूर्वी पहिला वनडे सामना खेळवला गेला. या सामन्यात भारताने न्यूझीलंडवर दमदार विजय साकारला. पण या सामन्यानंतर भारतासाठी एक वाईट बातमी आली. हा सामना संपला आणि वॉशिंग्टन सुंदरला थेट हॉस्पिटलमध्ये दाखल करावे लागले. कारण क्षेत्ररक्षण करत असताना त्याला दुखापत झाली होती. त्यामुळे फलंदाजीला येणार की नाही, हे कोणालाच माहिती नव्हते. पण दुखापत असूनही सुंदरला फलंदाजीला पाठवेल गेले.याबाबत मोहम्मद कैफ म्हणाला की, ' गौत गंभीर हे खेळाडूंबरोबर कसा दुजाभाव करतात, हे आता समोर आलं आहे. वॉशिंग्टन सुंदरला दुखापत झाली होती, तरी त्याला गौतम गंभीर यांनी फलंदाजी करण्यासाठी पाठवलं. गंभीर यांना त्याच्या दुखापतीची काळजी नव्हती. पण दुसरीकडे जेव्हा शुभमन गिलला दुखापत झाली होती, तेव्हा त्याला मैदानात फलंदाजीला न पाठवण्याचा निर्णय गौतम गंभीर यांनी घेतला होता. जर खेळाडूला दुखापत झाली तर गौतम गंभीर यांचे हे दोन वेगवेगळे निर्णय समोर आले आहेत. त्यामुळे गौतम गंभीर संघात कसं राजकारण करतात, हे आता समोर आलं आहे.गौतम गंभीर हे संघात कसा दुजाभाव करतात याचा पर्दाफाश आता मोहम्मद कैफने केल्याते पाहायला मिळाले आहे.




# चाळीतलं घर ते 2BHK घराची स्वप्नपूर्ती!

## नव्या घराविषयी बोलताना भारावली प्रियांका तेंडोलकर

**मुंबई :** अभिनेत्री प्रियांका तेंडोलकर मराठी टेलिव्हिजन विश्वातील एक लोकप्रिय अभिनेत्री आहे. सध्या 'ठरलं तर मग' मालिकेतील तिच्या प्रिया या भूमिकेने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य केले आहे. प्रिया जरी नायिकेच्या नाकीनऊ आणणारी खलनायिका असली तरीही प्रेक्षक तिचं काम एन्जॉय करतात. या प्रियाने वैयक्तिक आयुष्यात नुकताच एक मोठा टप्पा पार केला आणि तो म्हणजे स्वत:च्या घराची स्वप्नपूर्ती! प्रियांकाने तिच्या आई-बाबांसह मिळून २इकघ घर खरेदी केले. अलिकडेच या नव्या घराविषयी बोलताना ती खूपच भारावली होती.

प्रियांका तेंडोलकर म्हणाली, 'ते घर आई-बाबांचं आणि माझं आहे. आम्ही तिघांनी मिळून हे घर घेतलं, ज्यामध्ये तिघांनीही बरोबरीने पैसा गुंतवला आहे. हा संसार कायम तिघांचा होता आणि तिघांचाच असणार आहे. तिघांच्या संसारातील हे छोटसं बाळ आहे, असं आपण म्हणूया. माझा जन्म चाळीत झालाय, त्यानंतर मग आम्ही १ठघ मध्ये राहत होतो, त्यानंतर १इकघ मध्येही राहिलो. मात्र, माझ्या आई-



बाबांचं स्वप्न होतं की 2BHK घर घ्यायला हवा. महाराजांच्या आणि स्वामींच्या कृपेने नवीन घर घेणं शक्य झालं. ते त्यांचच घर आहे, आम्ही त्यात राहतो.' एका मुलाखतीत प्रियांका बोलत होती.

दरम्यान प्रियाने असेही सांगितले की, तिच्या आईचा आणि तिचा इंटिरिअर डिझाइनचा व्यवसाय आहे. त्यामुळे नवीन घर कसं सजवायचं आणि कुठे काय ठेवायचं, हे स्वप्न त्यांनी आधीच पाहिलं होतं. इंटिरिअर करताना ती सगळी स्वप्न पूर्ण केल्याचं प्रियांकाने सांगितलं. प्रियांका म्हणाली की, 'आम्हाला जितकं झेपेल, परवडेल आणि जे आमच्या सोयीचं असेल असं आमचं ते घर आहे.' प्रियांकाने असेही म्हटले की, त्यांचं घर मोठं होत असताना त्यांनी घरातील देव्हाराही पूर्वीच्या घरापेक्षा मोठा केला आहे. तसेच गेली अनेक वर्ष प्रियाच्या घरी शेगांवच्या गजानन महाराजांची पालखी येते, यंदा नवव्या वर्षी नव्या घरात ही पालखी आली. काही दिवसांपूर्वी अभिनेत्रीने या पालखीनिमित्ताने शेअर केलेल्या काही फोटोंमध्येही तिच्या या नव्या घराची आणि खास बनवून घेतलेल्या देव्हाऱ्याची झलक पाहायला मिळाली.

# कॅन्सरशी झुंज देणाऱ्या दीपिका कक्करने सांगितली भयंकर परिस्थिती

**मुंबई :** अभिनेत्री दीपिका कक्कर सध्या कॅन्सरची ट्रीटमेंट घेते आहे. यासंबंधी आणि तिच्या दैनंदिन आयुष्यातील अनेक गोष्टी या व्लॉगवर ती शेयरही करत असते. नुकताच तिने दिवाळी सेलिब्रेशनचा व्लॉग शेयर केला. यादरम्यान तिने सेलिब्रेशनसहित सध्या तिच्या ट्रीटमेंटबाबतची अपडेटही चाहत्यांना दिली.

यामध्ये दीपिका सांगते की काही केसेसमध्ये लिव्हर कॅन्सरसाठी टार्गेट थेरेपी घेतल्यानंतर अनेकांचे केस जातात. यामध्ये तिलाही ट्रीटमेंटच्या गंभीर दुष्परिणामांचा सामना करावा लागतो आहे. यामुळे तिचे केस गळत आहेत. तिने या त्रासापासून सुटका करून घेण्यासाठी हेअर पॅच वापरण्याचा निर्णय घेतल्याचेही सांगितले.दीपिका पुढे म्हणते माझ्या डॉक्टरने मला



सांगितले की टार्गेटेड थेरपीमध्ये फार कमी लोकांचे केस गळतात. पण माझ्या केसांकडे तुम्ही नीट पाहिले तर लक्षात येईल की माझे किती केस गळत आहेत. मी आता हेअर पॅच मागवले आहेत. या सगळ्यात मला थायरॉईडचा त्रास होतो आहे. त्यात मला हार्मोनल असंतुलनाचा त्रास होतो आहे. मी तुम्हाला परत परत सांगू इच्छिते की आरोग्य ही सगळ्यात महत्त्वाची गोष्ट आहे. करियरवर लक्ष देणे गरजेचे आहेच. पण त्या ही पेक्षा महत्वाचे आहे आरोग्याची काळजी घेणे आणि आपल्या जीवलगांसोबत वेळ घालवा. मला जवळपास अडीच वर्षे ही औषधे घ्यायची आहेत. मला याबाबत काहीच अडचण नाही. मी यातून बरी होईन याची मला खात्री आहे.



# आम्ही वेगळे झालो, खूप वाईट टप्पा.. भीती वाटत होती

## 'नवरी मिळे हिटलरला' फेम अभिनेत्रीचं मोडलं लग्न; कठीण काळाविषयी म्हणाली..

**मुंबई :** अभिनेत्री भूमिजा पाटील मराठी मनोरंजन विश्वातील एक लोकप्रिय चेहरा आहे. ती 'नवरी मिळे हिटलरला' या मालिकेतून घराघरात पोहोचली. शिवाय सोशल मीडियावरही भूमिजाचा मोठा चाहतावर्ग आहे. परिणामी भूमिजाचं वैयक्तिक आयुष्याचीही चर्चा होते. अलिकडेच तिने तिच्या खासगी जीवनाबद्दल भाष्य करताना तिचं लग्न म ोडल्याविषयी भाष्य केले.

जानेवारी २०२३ मध्ये तिचा साखरपुडा झालेला, अभिनेत्रीने या क्षणाचे काही खास फोटोही सोशल मीडियावर शेअर केलेले. तिने नुकतीच एक मुलाखत दिली, ज्यात तिने सांगितले की, ती आणि तिचा जोडीदार वेगळे झाले आहेत. आयुष्याच्या कोणत्याही वळणावर बहिणीची सोबत आहे याविषयी बोलताना तिने असे म्हटले की, 'सगळ्यांनाच माहितीये की माझा साखरपुडा झालेला आहे आणि लग्न होणार होतं. बऱ्याच लोकांना असंही वाटतं की, माझं लग्न झालंय. दुर्दैवाने ते आता नाही आहे. मी याआधी अनेक मुलाखतींमध्ये बोलले आहे की, लग्नासाठी मी किती उत्सुक आहे किंवा मला लग्न करायचं आहे. काही कारणास्तव आम्ही आता वेगळे झालो आहोत.' एका मुलाखतीत भूमिजा बोलत होती. भाऊबीजेनिमित्ताने भूमिजा आणि तिची बहीण प्रणाली या मुलाखतीत सहभागी झाल्या होत्या.

भूमिजा पुढे म्हणाली, 'हा माझ्या आयुष्यातला खूप महत्त्वाचा निर्णय होता, ज्याची मला खूप जास्त भीती वाटत होती. लोक काय म्हणतील, आता काय होईल याचा विचार येत होता. पण त्या सगळ्या परिस्थिती, जिथे मी म्हटलेलं की मला त्रास होतोय किंवा मी काहीतरी चुकीचा निर्णय घेतलाय... तेव्हा मी हे फक्त माझ्या ताईजवळ आणि मम्मी पप्पांशी बोलले. दोन्ही बहिणींसोबत मी सर्वात आधी बोलले. त्यावेळी लोक काय म्हणतील हा मुद्दाच आला नाही, त्या दोघींचं म्हणणं होतं की, तू ठाम आहेस का, यामुळे त्रास नाही ना होणार? तर आम्ही तुझ्यासोबत आहोत. जर तुला त्रास होणार असेल तर तो आम्हाला बघवणार नाही, त्या म्हणाल्या की, त्यामुळे तू घे निर्णय. माझ्या आयुष्यातला हा खूप मोठा निर्णय होता, या सगळ्या प्रक्रियेत त्या माझ्यासोबत होत्या. आयुष्यातील खूप वाईट टप्पा होता तो.'

भूमिजाने असे म्हटले की, तिच्या बहिणींसोबतच्या संभाषणात ती चुकीची किंवा बरोबर असा मुद्दाच आला नाही. 'तुझा आनंद हा आमचा आनंद' असे तिच्या बहिणींनी म्हटल्याचे ती म्हणाली.

# श्री. पुंडलिक महाराज महाविद्यालयात जर्मन व जपानी भाषा कार्यशाळा संपन्न !

## आता नांदुरा येथील विद्यार्थ्यांना सुद्धा शिकता येणार जर्मन व जपानी भाषा

**जनसंचलन/ नांदुरा**

स्थानिक श्री. शिवाजी शिक्षण संस्था अमरावतीद्वारा संचालित श्री. पुंडलिक महाराज महाविद्यालयात जर्मन व जपानी भाषा तसेच जर्मनी व जपान या देशांमध्ये भारतीय विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या रोजगाराच्या संधी या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली आहे. दि. १३जानेवारी २०२६ रोजी श्री. पुंडलिक महाराज महाविद्यालय नांदुरा येथे जर्मन व जपानी भाषा तसेच परदेशात भारतीय विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या रोजगाराच्या संधी या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यशाळा महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी विभागामार्फत (आय. क्यू .ए.सी.) आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. करमसिंग राजपूत हे होते. सदर कार्यशाळेचे उद्घाटन ॲड. शा. का. कळसकर, आजीव सदस्य श्री. शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती यांच्या हस्ते पार पडले. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून महादेव येरळीकर, डॉ. दिलीप महाजन यांची उपस्थिती लाभली. या कार्यशाळेत प्रमुख वक्ते म्हणून डॉ. विजय वाकोडे, अर्थशास्त्र विभाग प्रमुख, शिक्षण प्रसारक मंडळ स्व. तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालय चिखली यांनी मार्गदर्शन केले. आपल्या व्याख्यानात त्यांनी जपान व जर्मनीमधील रोजगाराच्या संधी, त्या देशांतील शैक्षणिक व औद्योगिक क्षेत्रातील गरज, तसेच परदेशात नोकरी मिळवण्यासाठी आवश्यक भाषा कौशल्यांचे महत्त्व स्पष्ट केले. आजच्या स्पर्धात्मक युगात परदेशी भाषा आत्मसात केल्यास विद्यार्थ्यांसाठी जागतिक स्तरावर करिअरच्या संधी खुल्या होतात, असे मत त्यांनी व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. करमसिंग राजपूत यांनी विद्यार्थ्यांनी केवळ पदवी शिक्षणापुरते मर्यादित न राहता कौशल्याधारित शिक्षणाकडे वळावे, तसेच परदेशी भाषा शिकून स्वतःच्या करिअरला नवी दिशा द्यावी असे आवाहन केले. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन महाविद्यालयातील जर्मनी व जपान भाषा अभ्यासक्रम समन्वयक प्रा. सुनंदा डेकाटे व सहसमन्वयक प्रा. सचिन जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी कार्यशाळेस उत्स्फूर्त प्रतिसाद देत प्रश्नोत्तर सत्रात सक्रिय सहभाग घेतला. महाविद्यालयाने आपल्या विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयातच जर्मन व जपानी भाषा शिकण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे. सुरवातीला प्रायोगिक स्तरावर आपल्या विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालय जर्मन व जपानी या दोन्ही भाषांचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम राबविणार आहे. महाविद्यालयातील अधिकाधिक विद्यार्थ्यांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा व परदेशात त्याद्वारे रोजगाराच्या संधी काबीज कराव्यात असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. करमसिंग राजपूत यांनी केले.या कार्यशाळेचे प्रास्ताविक जर्मन भाषा शिक्षिका तसेच या दोन्ही अभ्यासक्रमांच्या समन्वयक प्रा. सुनंदा डेकाटे यांनी केले. त्यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात जर्मन भाषेचे महत्त्व स्पष्ट करून विद्यार्थ्यांनी जर्मन भाषा अवगत केल्यामुळे देश-विदेशातील निरनिराळ्या क्षेत्रात प्राप्त होणाऱ्या रोजगाराच्या विविध संधीबद्दल माहिती दिली. सदर कार्यशाळेचे सूत्रसंचालन आयक्यूएसी समन्वयक डॉ. स्मिता तराळे ह्यांनी केले तर आभारप्रदर्शन विदेशी भाषा अभ्यासक्रम सहसमन्वयक प्रा. सचिन जाधव यांनी केले.

# मृद व जलसंधारण मंत्री ना. संजय राठोड यांचा दौरा

**जनसंचलन/बुलडाणा**

राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री ना. संजय राठोड हे उद्या बुधवार दि.१४ जानेवारी रोजी जिह्याच्या दौऱ्यावर येणार आहेत. त्यांच्या दौऱ्यानुसार सकाळी ११.४५ वाजता राजगड हेलिपॅड येथे आगमन, त्यानंतर दुपारी १२ वाजता मेहकर तालुक्यातील राजगड येथील श्री संत जयराम महाराज संस्थान येथे दर्शन घेवून भव्य यात्रा महोत्सव आणि सत्कार समारंभास उपस्थिती, दुपारी १ वाजता टेंबुरखेडा येथे दर्शन घेवून भव्य यात्रा महोत्सवास उपस्थित राहणार आहेत. त्यानंतर शिर्डीकडे रवाना होतील.

# जिल्हास्तरीय सूर्यनमस्कार प्रशिक्षण व योगसाधना शिबीर उत्साहात संपन्न

**जनसंचलन/बुलडाणा**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बुलढाणा तसेच आहिल्या योग केंद्र व निसर्ग उपचार केंद्र, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने आज सकाळी भारत विद्यालय, बुलढाणा येथे जिल्हास्तरीय सूर्यनमस्कार प्रशिक्षण-स्पर्धा व योगसाधना शिबीर उत्साहात पार पडले. छत्रपती योग व क्रीडा प्रशिक्षण केंद्र, ता. अंबड, जिल्हा जालना येथे झालेल्या राज्यस्तरीय सूर्यनमस्कार शिक्षक प्रशिक्षण (टी.ओ.टी.) स्पर्धा व दोन दिवसीय योगसाधना शिबिरातून प्रशिक्षित झालेले मास्टर ट्रेनर्स यांच्या तांत्रिक सहकार्याने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत सूर्यनमस्काराची शास्त्रशुद्ध पद्धत, योगसाधनेचे महत्त्व व नियमित सरावाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या प्रशिक्षणाचा लाभ भारत विद्यालयातील विद्यार्थी व शिक्षकवृंद यांनी घेतला. शिबिरामुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण होऊन योगसाधनेकडे सकारात्मक दृष्टिकोन विकसित होण्यास मदत झाली, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमास भारत विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रल्हाद गायकवाड, क्रीडा अधिकारी एस. एस. केळे यांच्यासह तारामती बद्रीनाथ जायभाये, उज्वला विजय शिंदे, सरला देशमुख, कालींदा नागरे (मास्टर ट्रेनर), स्वाती देगुलकर (मास्टर ट्रेनर), नंदा शेजोळ चाटे (मास्टर ट्रेनर), अर्चना फासे (जुमडे), जयश्री देशपांडे आदी मान्यवर उपस्थित होते.

# अमृतच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी स्वयंरोजगार प्रशिक्षण योजना

**जनसंचलन/बुलढाणा**

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील नागरिकांसाठी महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था अमृतच्या माध्यमातून मोफत स्वयंरोजगार व कौशल्य विकास प्रशिक्षण योजना राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत लाभार्थ्यांना वैयक्तिक व्याज परतावा, रोजगारक्षम व स्वयंरोजगारासाठी आधुनिक प्रशिक्षण मोफत उपलब्ध करुन दिले जाणार आहे. प्रशिक्षणांचा मुख्य उद्देश लाभार्थ्यांना स्वावलंबी बनवून त्यांचे सामाजिक व आर्थिक स्थान उंचावणे आहे. ज्यांना आजवर कोणत्याही शासकीय अनुदान, महामंडळ किंवा शासकीय योजनांचा लाभ मिळालेला नाही, अशा खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना अमृतच्या माध्यमातून लाभ दिल्या जाणार आहे. योजनेंतर्गत प्रशिक्षणे : ॲडव्हान्स ब्युटी पार्लर व फॅशन डिझायनिंग, अमृत सूर्य मित्र, आयात-निर्यात, बेकरी, अन्न व फळ प्रक्रिया, गृह उद्योग, इव्हेंट व्यवस्थापन, मसाले उत्पादन, फोटोशॉप व ग्राफिक डिझायनिंग, मोबाइल रिपेअरिंग, दुग्धजन्य उत्पादने उत्पादन प्रशिक्षण, असे विविध रोजगाराभिमुख प्रशिक्षणे दिली जाणार आहेत. ही योजना खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी असून राजपूत, ठाकूर, ब्राह्मण, मारवाडी, गुजराती, कोमटी, सिंधी, कायस्थ, जाट, बनिया, बंत्स, कम्मा, नायर, नायडू, एय्यंगार, पाटीदार, बंगाली पटेल, येलमार, त्यागी, राजपुरोहित, सेनगुंनथर इत्यादी समाजातील पात्र नागरिकांचा समावेश आहे. तरी जिल्ह्यातील पात्र लाभार्थ्यांनी प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा व स्वतःचा रोजगार उभारून स्वयंपूर्ण व्हावे, असे आवाहन अमृत संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा व्यवस्थापक जिग्नेश कमाणी (८३०८९९८९२२) अमृत जिल्हा कार्यालय, फ्लॅट नं. ३०५, तिसरा मजला, बुलढाणा प्राइड बिल्डिंग, तहसील कार्यालय समोर, बुलढाणा येथे संपर्क साधावा.

# सोमवारी (१९ जानेवारी) जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन

**जनसंचलन/बुलढाणा**

दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी शासन निर्णयानुसार जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येतो. त्याअनुषंगाने जानेवारी महिन्याचा महिला लोकशाही दिन सोमवार, दि. १९ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात घेण्यात येणार आहे. तरी पिडीत महिलांनी महिला लोकशाही दिनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन महिला व बालविकास अधिकारी अमोल डिघुळे यांनी केले आहे. महिला लोकशाही दिनात समस्याग्रस्त व पीडित महिलांनी उपजिल्हाधिकारी यांना उद्देशून विहित नमुन्यातील अर्ज द्विप्रतीत सादर करावेत. तक्रार/निवेदन वैयक्तिक स्वरूपाचे असणे आवश्यक आहे. लोकशाही दिनामध्ये महिलांनी स्वतः उपस्थित राहणे अनिवार्य आहे. विहित नमुन्यात नसलेले अर्ज, न्यायप्रविष्ट, सेवा व आस्थापना विषयक प्रकरणे तसेच वैयक्तिक स्वरूपाचे नसलेले निवेदन स्वीकारले जाणार नाही. समस्याग्रस्त व पीडित महिलांचे प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने शासनाने हे व्यासपीठ उपलब्ध करून दिले असून, पीडित महिलांनी महिला लोकशाही दिनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# चिखली नगर परिषदेत सत्तासंघर्षाचा नवा अध्याय!

## उपाध्यक्षा पदी शिवसेना (शिंदे गट) च्या वैशाली खेडेकर, भाजप-काँग्रेस-राष्ट्रवादीत हालचालींना वेग

जनसंचलन/ चिखली

नगर परिषदेत राजकीय कुरघोड्यांचा धडाका उडवत उपाध्यक्षा पदी शिवसेना (शिंदे गट)च्या वैशाली कपिल खेडेकर यांची निवड झाली असून, या निवडीमुळे शहराच्या राजकारणात मोठी खळबळ माजली आहे. सत्ताधाऱ्यांनी ताकद दाखवत महत्त्वाच्या पदावर दावा ठोकला असताना विरोधकांची गणिते पूर्णपणे बिघडल्याचे चित्र दिसत आहे. याचवेळी स्वीकृत नगरसेवक म्हणून भाजप शहराध्यक्ष सागर पुरोहित आणि सुरेंद्र ठाकूर यांची निवड करण्यात आली आहे. भाजपने थेट मैदानात उतरून आपली संघटनात्मक ताकद आणि सत्ता टिकवण्याचा स्पष्ट संदेश दिला आहे. नगर परिषदेत भाजपचा प्रभाव अधिक बळकट करण्याची ही खेळी असल्याचे



राजकीय वर्तुळात बोलले जात आहे. दुसरीकडे काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांनीही माघार न घेता स्वीकृत सदस्य म्हणून प्रा. डॉ. निलेश गावंडे सर यांची निवड करून आपली उपस्थिती ठळक केली आहे. विरोधकही आता अधिक आक्रमक पवित्रा घेण्याच्या तयारीत असल्याचे संकेत मिळत आहेत. एकूणच चिखली नगर परिषदेत सत्ताधारी आणि विरोधकांमधील संघर्ष अधिक तीव्र होणार असून, येणाऱ्या काळात विकासाच्या नावाखाली राजकीय आरोप-प्रत्यारोपांची मालिका सुरू होण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत.

# डोणगाव असुरक्षित? रात्री १:४५ चा थरार!

जनसंचलन/ डोणगाव





शहरात गुन्हेगारी वृत्ती पुन्हा एकदा उफाळून आली असून, मध्यरात्री भरवस्तीत उभ्या असलेल्या वाहनावर हल्ला करून अज्ञातांनी दहशत माजवली आहे. आरेगाव रोड परिसरातील रहिवासी मनोज काळे यांच्या मालकीच्या सुप्रो वाहनाची समोरील काच फोडून आरोपींनी थेट कायदा-सुव्यवस्थेलाच आव्हान दिले आहे. सोमवारी मध्यरात्री सुमारे १:४५ वाजताच्या सुमारास स्कुटीवरून आलेल्या दोन अज्ञात इसमांनी गाडीसमोर थांबून दगडाने जोरदार प्रहार केला. क्षणार्धात वाहनाची समोरील काच पूर्णपणे फुटली आणि आरोपी घटनास्थळावरून पोबारा करून पसार झाले. विशेष म्हणजे ही संपूर्ण थरारक घटना परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात स्पष्टपणे कैद झाली आहे. मुख्य रस्त्यावर आणि घनवस्तीत अशा प्रकारे निर्ढावलेपणाने करण्यात आलेल्या हल्ल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. आरोपींना कायद्याची भीती उरली नाही का? असा सवाल उपस्थित केला जात आहे. वारंवार घडणाऱ्या अशा घटनांमुळे डोणगावच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकरणी पोलिसांनी तपास सुरू केला असून सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींचा शोध घेतला जात आहे. मात्र, नागरिकांनी आरोपींना तात्काळ अटक करून कठोर कारवाईची मागणी केली आहे.

## वाद मिटविण्याच्या बहाण्याने बोलावून दोघांना मारहाण

जनसंचलन/ देऊळगाव राजा

मिटविण्याच्या बहाण्याने बोलावून एका तरुणासह त्याच्या आईला मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याची गंभीर घटना १२ जानेवारी रोजी दुपारी ३ वाजता घडली. या प्रकरणी देऊळगाव राजा पोलिस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अनिकेत परमेश्वर जाधव (वय २९, रा. त्रंबकनगर, देऊळगाव राजा) यांनी तक्रार दाखल केली आहे. आरोपींमध्ये रामेश्वर दत्ता पवार, चेतन रामेश्वर पवार, श्रीकांत रामेश्वर पवार आणि अर्चना रामेश्वर पवार (सर्व रा. देऊळगाव राजा) यांचा समावेश आहे. तक्रारकर्ते व आरोपी यांच्यातील जुना वाद सध्या न्यायालयात प्रलंबित असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. हा वाद समेटाने मिटवू, असे सांगून आरोपींनी तक्रारदारास सिंदखेड राजा रस्त्यावरील हॉटेलमध्ये बोलावले. तेथे कोर्टातील केस मागे घेणार का, अशी विचारणा करत रामेश्वर पवार याने काठीने तक्रारकर्त्यास मारहाण केली. चेतन पवार याने लोखंडी गजाने वार केल्याचा आरोप असून, श्रीकांत पवार यांनीही मारहाण केल्याचे तक्रारीत नमूद आहे. रामेश्वर पवार याने फिर्यादीच्या आईला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली, तसेच अश्लील शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप तक्रारीतून केला आहे, तसेच अर्चना पवार यांनीही मारहाण केल्याचे तक्रारीत आहे. म्हटले १२ जानेवारी रोजी दुपारी घडली घटना या घटनेप्रकरणी जाणीवपूर्वक दुखापत करणे, अश्लील व अपमानास्पद शिवीगाळ करणे, गंभीर परिणामांची धमकी देणे, सामूहिकरीत्या हल्ला करणे आणि गुन्हेगारी हेतूने कृत्य करणे, अशा स्वरूपाचे गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. फिर्याद व वैद्यकीय अहवालाच्या आधारे पोलिसांनी कारवाई केली असून, आरोपींविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाईची नोंद करण्यात आली आहे. या प्रकरणाचा तपास ठाणेदार ब्रह्मा गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली देऊळगाव राजा पोलिस करीत आहेत.

# बुलढाणा नगरपालिकेत सत्तेचा नवा डाव!

## उपनगराध्यक्ष पदी गजेंद्र दांदडे यांची निवड...

जनसंचलन/बुलढाणा

बुलढाणा नगरपालिकेतील राजकारणात मोठी घडामोड घडताना दिसून आली आहे उपनगराध्यक्ष पदी गजेंद्र दांदडे यांची सर्वानुमते निवड झाली आहे. उपनगराध्यक्ष पदासाठी अधिकृत निवडणूक प्रक्रिया पार पडली आहे.नगरपालिकेच्या सभागृहात हि महत्वपुर्ण बैठक घेण्यात आली आहे. या महत्त्वपूर्ण निवड प्रक्रियेसाठी नगराध्यक्ष पुजाताई संजय गायकवाड, नगरपालिकेतील गटनेते मृत्युंजय गायकवाड तसेच शिवसेनेचे सर्व नगरसेवक उपस्थित राहून आपली ताकद दाखवत एकसंघ शिवसेना, शिस्तबद्ध मतदान करून गजेंद्र दांदडे यांची उपनगराध्यक्ष पदी निवड करण्यात आली आहे.गजेंद्र दांदडे यांनी यापूर्वी पाणीपुरवठा सभापती पद भूषविताना कार्यक्षम व आक्रमक प्रशासकीय भूमिका घेतली होती. पाणीप्रश्न, नागरिकांच्या तक्रारी आणि कामातील गती यामुळे त्यांनी स्वतंत्र ओळख निर्माण केली. त्यामुळे आता त्यांची थेट उपनगराध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली आहे.यावेळी बुलढाणा



शहरात आनंदमय वातावरण दिसून आले आहे.बुलढाणा शहरात भव्य मिरवणूक काढण्यात आली आहे.गुलालाच्या व डिजेच्या तालामध्ये भव्य अशी मिरवणूक दिसून आली आहे .

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====

संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८